बन्सीलाल रामनाथ अगरवाल चॅरिटेबल ट्रस्ट संचलित
विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी
(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त संस्था)
(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)
६६६, अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे - ४११ ०३७.
Approved by A. I. C. T. E. New Delhi

Bansilal Ramnath Agarwal Charitable Trust's
Vishwakarma Institute of Technology
An Autonomous Institute Affiliated to Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)
666, Upper Indiranagar, Bibwewadi, Pune - 411 037.
Identification No. - PU/PN/Engg./061/(1984)

नोटीस क्र. २९५

# नोटीस

दि. १३/०४/२०२६

**शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता शिष्यवृत्ती/फ्रिशीप/ ईबीसी/ अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती/दिव्यांग शिष्यवृत्ती अथवा इतर योजनाच्या सवलतीसाठी पात्र ठरत असलेल्या विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवरून ऑनलाईन अर्ज भरणेकरिता जाहीर झालेल्या दि. ३० जून २०२६ मुदतवाढीबाबत तसेच शै.वर्ष २०२३-२४ आणि २०२४-२५ मध्ये अर्ज भरलेला आहे परंतू रि-अप्लाय साठी विद्यार्थी लॉगीनला दिसत आहे अशा विद्यार्थ्यांनी अर्ज रि-अप्लाय करणेबाबत शासनाने जाहीर केलेल्या दि. ३०/०६/२०२६ च्या मुदतवाढीबाबत.**

(महाडीबीटीव्दारे अर्ज सादर न केलेल्या विद्यार्थ्यांकरिता)

महाविद्यालयातील खालील अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, शासनाच्या नियमानुसार राखीव (SC/ST/OBC/SBC/VJ/DT/NT) /खुल्या (Open-EBC/ EWS/ SEBC/ORPHAN) प्रवर्गातील ज्या ज्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क अथवा विकास निधी इत्यादी शुल्क माफ करून प्रवेश देण्यात आलेला आहे अशा सर्व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क अथवा विकास निधीची पूर्तती शासनाकडून होत असते त्यासाठी सवलतधारक विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवरून दि. ३१/०३/.२०२६ ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक व बंधनकारक आहे. अशा विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही महाडीबीटी पोर्टलवरून ऑनलाईन अर्ज भरलेले नसतील किंवा शैक्षणिक वर्ष २०२३-२४ व २०२४-२५ मध्ये विद्यार्थ्यांना त्यांचे अर्ज-रिअप्लाय करणेबाबत दि. ३०/०६/२०२६ पर्यंत मुदतवाढ जाहीर केलेली त्यापूर्वीच विद्यार्थ्यांनी अर्ज भरणे महाविद्यालयाकडे सादर करावेत अन्यथा अशा विद्यार्थ्यांना दिली गेलेली वरील शुल्काची सवलत रद्द झाल्यास त्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

-:सवलतीच्या लाभासंदर्भात महत्त्वाच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे:-

१) महाविद्यालयातील SC/ST/OBC/SBC/VJ/DT/NT/SEBC/EWS/OPEN/ORPHAN विद्यार्थ्याचा प्रवेश केंद्रिय प्रवेश प्रक्रियेव्दारा (CAP) व्दारे झालेला असला पाहिजे व त्याने महाविद्यालयाने दिलेले कॅप लेटर (Receipt cum acknowledgement of confirmation of Admission First Year) हे त्याचे प्रोफाईलमध्ये करंड कोर्स डिसेल्समध्ये अपलोड केलेले असले पाहिजे. याव्यतिरिक्त करंट कोर्स डिसेल्समध्ये फी पेड शून्य नमूद करावे व जी काही फी रिसिप्ट महाविद्यालयाने दिलेली आहे ती अपलोड करावी.

२) विद्यार्थी हा महाराष्ट्र राज्याचा राहिवासी असल्याचे आदिवास प्रमाणपत्र (डोमासाईल) त्यांने सादर/अपलोड केले पाहिजे.

३) याव्यतिरिक्त जे विद्याथर्थी SC/ST/OBC/SBC/VJ/DT/NT या प्रवर्गातील विद्यार्थ्याचा प्रवेश संस्थास्तरावर म्हणजेच Against CAP व्दारे झाला असल्यास व त्यांचे पालकांचे वार्षिक उत्पन्न रू. २,५०,०००/- रूपयांचे खाली असल्यास ते विद्यार्थी सवलतीस पात्र ठरत आहेत व त्यांनी महाडीबीटी पोर्टलवरून ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. अशा विद्यार्थ्यांना अर्ज भरते वेळेस प्रोफाईलमध्ये Against CAP व्दारे प्रवेशित असे नमूद करणे अनिवार्य राहील. Against CAP व्दारे प्रवेशित विद्यार्थ्यांच्या सवलतीबाबत शासनाने /संबंधित विभागाने घेतलेले निर्णय अंतिम असतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

४) विद्यार्थ्यांचे पालकांचे सर्व मार्गाने वार्षिक उत्पन्न शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या मर्यादेत असावे. तसेच शासनाच्या नियमानुसार योजनेच्या लाभाकरिता OBC/SBC/VJ/DT/NT/SEBC या प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांना वैध असे **नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र** महाडीबीटी पोर्टलवर डॉक्युमेंटस् अपलोड सेक्शनमध्ये सादर करणे अनिवार्य आहे.

५) विद्यार्थ्यांची वर्गातील उपस्थितीत ७५% टक्के पेक्षा जास्त असली पाहिजे व तसे उपस्थिती प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

६) SC/ST/OBC/SBC/VJ/DT/NT या प्रवर्गातील नुतनीकरणाच्या (व्दितीय/तृतीय/अंतिम वर्ष बी.टेक) मधील विद्यार्थ्यांना नवीन उत्पन्न दाखला न काढता पूर्वीच्या पहिल्या वर्षाचा दाखला जोडणे अनिवार्य आहे.

७) नव्याने प्रवेशित सर्व लाभार्थी विद्यार्थ्यांना सन २०२५-२६ या वर्षी प्रथम /थेट व्दितीय वर्षाकरिता प्रवेश घेतला असल्याने त्याने मागील आर्थिक वर्ष म्हणजेच २०२४-२५ या वर्षाचा व दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत वैध असणारा मा. तहसिलदार यांनी प्रमाणित केलेला पालकांचा उत्पन्न दाखला जोडणे करणे अनिवार्य आहे.

८) Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojna(EBC) या योजनेकरिता पात्र ठरत असलेल्या नवीन व नुतनीकरणाच्या OPEN /SEBC/EWS/ /ORPHAN या प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांना त्यांचे पालकांच्या नावाने काढलेला व मा. तहसिलदार यांनी प्रमाणित केलेला आर्थिक वर्ष म्हणजेच २०२४-२५ या वर्षाचा व दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत वैध असलेला उत्पन्न प्रमाण महाडीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्याने अपलोड करणे अनिवार्य आहे. चुकीचा दाखला अपलोड केल्यास सवलत रद्द केली जाईल याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

९) ज्या SC/ST/OBC/SBC/VJ/DT/NT विद्यार्थ्यांचे प्रवेश AGAINST CAP स्तरावर झालेले आहेत ते शासनाच्या नियमानुसार **Post Matrics Scholarship** (शिष्यवृत्ती) योजनेसाठी पात्र आहेत किंवा होत आहेत त्यांनी महाडीबीटी पोर्टलवरून अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी. संबंधित विद्यार्थ्यांची SC/ST/OBC/SBC/VJ/DT/NT साठी रू. 2,50,000/-, (रूपये दोन लाख पन्नास हजार फक्त) पर्यंत वार्षिक उत्पन्न मर्यादेची अट आहे.

१०) नवीन शासन नियमाप्रमाणे **OBC/SBC/VJ/DT/NT/SEBC** या प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रूपये आठ लाखापेक्षा जास्त आहे व ज्यांच्याकडे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र व उत्पन्नाचा दाखला आहे असे सर्व विद्यार्थी हे Tuition and Exam Fees for OBC, /Tuition and Exam Fees for VJNT/Tuition and Exam Fees for SBC पात्र असतील व त्यांनी महाडीबीटी पोर्टलवरून आपले ऑनलाईन अर्ज नोंदणी करून त्याची प्रत व कागदपत्रे महाविद्यालयात सादर करावेत.

११) वरील नोटीस मुदतीत जे विद्यार्थी/विद्यार्थीनी आपले महाडीबीटी पोर्टलवरून ऑनलाईन भरलेले अर्ज सादर करणार नाहीत अशा विद्यार्थ्यांना दिलेली सवलत रद्द झाल्यास विद्यार्थ्यास/विद्यार्थीनीस शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क किंवा विकास निधी इत्यादी शुल्काची रक्कम भरावी लागल्यास त्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही यादी नोंद घ्यावी.

१२) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज विद्यार्थ्याचे लॉगीनला कोणत्याही कारणास्तव प्रलंबित राहणार नाही याची दक्षता घ्यावी. जर विद्यार्थ्याचे लॉगीनमध्ये रि-अप्लाय ऑप्शन आल्यास अर्ज Cancel न करता त्वरीत दुरूस्ती करून तो अर्ज महाविद्यालयाचे लॉगीनला मंजूरीकरिता पाठवता व महाविद्यालयाला तसे प्रत्यक्षात भेटून कळवावे.

१३) विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक हा त्याचे बँकेशी संलग्नीत /लिंक असणे आवश्यक व जरूरीचे आहे.

१४) कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांनी Right to Givt Up या ऑप्शनला क्लिक करू नये. केल्यास, विद्यार्थ्याने सवलत स्वत:हून रद्द केली आहे असे समजून त्याच्याकडून त्या शैक्षणिक वर्षाची शिक्षण शुल्क व इतर फी वसूली केली जाईल याची नोंद घ्यावी.

१५) खालील तक्त्यात विद्यार्थ्यांना लागू असलेल्या योजनांचा तपशील दिलेला आहे, त्याप्रमाणे विद्यार्थ्यांनी योजनेसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

१६) ज्या विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवरून अर्ज भरला असल्यास केंद्र शासनाच्या इतर सवलतींना विद्यार्थ्यांनी अर्ज भरू नयेत. केंद्र व राज्य शासन अशा दोन्ही सवलती विद्यार्थ्यांना लागू नहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी. महाडीबीटीवरील योजेनेकरिता पात्र नसलेला विद्यार्थी केंद्र शासनाच्या नियम व अटीनुसार पात्र ठरत असतील तर तो केंद्र शासनाच्या सवलतींना अर्ज करून शकतो याची देखील नोंद विद्यार्थ्यांनी घ्यावी.

१७) विद्यार्थ्यांनी वेळोवेळी आपल्या महाडीबीटी लॉगीनवरून अर्जाची स्थिती पहावी त्या-त्या वर्षाचे अर्ज ॲप्रव्हड् नसतील तर महाविद्यालयाशी संपर्क साधावा.

१८) SC/ST/OBC/SBC/VJ/DT/NT/SEBC/EWS/OPEN/ORPHAN या प्रवर्गातील महाडीबीटी सवलतधारक विद्यार्थ्याने त्याचा अभ्यासक्रम मध्येच सोडल्यास त्यास मंजूर झालेली किंवा होणारी संपूर्ण शुल्क भरणे अनिवार्य राहील याची नोंद घ्यावी.

१९) महाराष्ट्र शासनाच्या संबंधित विभागाने सवलतीसंदर्भात वेळोवेळी केले सर्व नियम, अटी व शर्ती विद्यार्थ्यांना लागू राहतील याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

२०) विद्यार्थ्यांना लागू असलेल्या योजनेकरिता काही अडचणी / शंका असल्यास महाविद्यालयाचे विद्यार्थी विभागाशी संपर्क साधावा.

संचालक
विश्वकर्मा इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे-३७

प्रत: १) सर्व विभाग प्रमुखांना माहितीसाठी, २) सर्व नोटीसबोर्डकरिता, ३) सिस्टीम विभाग प्रमुख यांना माहितीकरिता व विभागाचे नोटीस बोर्डकरिता प्रकाशित करणेकामी.